वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# आबंडेकरी अनुयायाची स्वाभिमानी वज्रमुठ तुतारीला पाठिंबा

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगराध्यक्षासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

## आंबेडकरी समाजावर अन्याय करणाऱ्यांची मस्ती जिरवा : चांदणे






बीड, (दिव्य न्युज):- राजकीय पक्षांनी खऱ्या आंबेडकरवादींना डावलून पाठीत खंजीर खुपसून ताटाखालचे उमेदवार उभे करुन जनतेच्या माथी मारुन धोका दिला. यामुळे नगरपरिषद निवडणुकीत पाठिंबा कोणाला द्यायचा यासाठी आज बीड शहरात आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची निर्णय बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सर्वांनी एकीची वज्रमूठ आवळून मनुवाद्यांना उखडून टाकण्यासाठी तुतारीला बळ देण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प.) पक्षाच्या उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. भिमसैनिकांनो निळा झेंडा, स्वाभिमान आणि आंबेडकर चळवळ पाहून जातीयवाद्यांना धडा शिकवा असे आवाहन पप्पू कागदे यांनी केले तर आंबेडकरी समाजावर अन्याय ▶▶ पान २ वर



## स्मिता विष्णू वाघमारे यांना समाज बांधवांचा पाठिंबा

### बीड शहरातील आंबेडकरी समाज बांधवांच्या निर्णायक बैठकीत निर्धार

बीड,(दिव्य न्युज):- बीड नगर परिषदेसाठी मागासवर्गीयांना आलेली अध्यक्ष पदाची संधी डावणाऱ्या सत्ताधारी प्रस्थापितांना व अजित पवार गटाला धडा शिकविण्यासाठी आज रोजी हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे बीड शहरातील आंबेडकरवादी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांची निर्णायक बैठक घेऊन स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्णय घेण्यात आला

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी जोपासत समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरून लढा उभा करण्याचे काम करणाऱ्या दलित चळवळीतील पदाधिकाऱ्यांना उमेदवारी डावलून समाजाशी कसलीही बांधिलकी नसणाऱ्या व आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी जाहीर करून ४० वर्षानंतर आम्हाला मिळालेली राजकीय संधी हिरावून घेऊन मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्याचे काम अजित पवार यांनी केले आहे. ▶▶ पान २ वर

## परळीच्या प्रचारसभेत धनंजय मुंडेंना वाल्मिक कराडची आठवण

# माझ्या सहकाऱ्याची आज मला खूप आठवण येते



परळी ,(दिव्य न्युज):- संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात प्रमुख आरोपी असलेल्या वाल्मिक कराड याची आठवण निवडणुकीच्या प्रचारादरम्यान धनंजय मुंडे यांना झाली. माझा सहकारी आज आपल्यात नाही याची जाणीव असल्याचे ते आपल्या भाषणात म्हणाले. तसेच न्यायालय काय खरे काय खोटे हे तपासून पाहील, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा एकनिष्ठ कार्यकर्ता. धनंजय मुंडे यांची बीडमधील सगळी कामे वाल्मिक कराड हाच पाहायचा. आर्थिक नियोजनापासून अगदी निवडणूक प्रचार यंत्रणेची जबाबदारी ▶▶ पान २ वर

# जातीपातीच्या समिकरणावर नाही तर विकासाच्या मुद्दयावर आम्ही निवडून येणार

## प्रत्येक वार्डात तुतारीलाच पसंती–आ.संदीप क्षीरसागर



बीड, (दिव्य न्युज):- बीडमध्ये सर्व जाती- धर्माचे लोक एकोप्याने राहतात. कितीही प्रयत्न केले तरी येथील सामाजिक सलोखा बिघडला नाही, आणि बिघडणार नाही. आणि ही एकजूटच आपली ताकत आहे, असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या कॉर्नर बैठकीत ते बोलत होते. बीड नगरपरिषदेसाठीनुकताच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांसाठी आ.संदीप क्षीरसागर प्रचाराला नुकतीच सुरुवात केली आहे. सुरूवातीलाच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्रपवार पक्षाच्या प्रचाराला मतदारांमधून तुफान प्रतिसाद मिळत आहे. शुक्रवार (दि.२१) रोजी, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ.स्मितातार्ई विष्णू वाघमारे तसेच प्रभाग क्रमांक ९ येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार शेख अथर (बब्बूभाई) , सौ.रेखाताई पिंगळे तसेच प्रभाग क्रमांक २१ चे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार कु.पोर्णिमा चव्हाण व विपूल गायकवाड यांच्या प्रचारार्थ ▶▶ पान २ वर

# जयदत्त आण्णांचा मास्टरस्ट्रोक, भाजपला देणार साथ

## आज जाहिर करणार भुमिका, पंडित बीडमध्ये आले आता जयदत्त क्षीरसागर गेवराईत घुसले

### गेवराईच्या बाळराजे पवारांची भेट घेवून उतरले निवडणुकीच्या मैदानात, डॉ.घुंबरेंना निवडून आणणार



बीड, (दिव्य न्युज):- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागल्या आणि सर्वच पक्षातील नेत्यांनी आपापले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी कंबर कसली.गेल्या कित्येक महिन्यांपासून माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या पक्ष प्रवेशाच्या चर्चा ऐकायला मिळत होत्या. त्याच अनुषंगाने गेल्या दोन दिवसांपासून वेगळीच चर्चा ऐकायला मिळत आहे. आता ही नवीन चर्चा कोणती तर स्थानिकच्या आखाड्यात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मोठा मास्टरस्ट्रोक मारला आहे. ते आता बीडमध्ये भाजपला साथ देणार आहेत. यासंदर्भात आज ते आपली अधिकृत भुमिका जाहीर करणार आहेत. तत्पुर्वी त्यांनी काल गेवराईत भाजप नेते बाळाराजे पवार यांची भेट घेवून पंडितांना मोठा ईशाराच दिला आहे. पंडितांनी बीडमध्ये पाऊल ठेवला असला तरी आता जयदत्त क्षीरसागर हेही गेवराईत घुसले आहेत. त्यामुळे बीड, गेवराईतील राजकिय गणिते आता खऱ्या अर्थाने बदलणार आहेत. येत्या दोन डिसेंबर रोजी नगर पालिकांसाठी मतदान होणार आहे. याअनुषंगानेच सध्या सर्वच राजकिय पक्षांच्या नेत्यांची धावपळ सुरू आहे. तसेच ठिकठिकाणी सभांचा धडाकाही सुरू आहे. कोणत्याही परिस्थितीत नगर पालिकांवर सत्ता आणायचीच असा संकल्प प्रत्येक पक्षांनी केलेला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे बीड शहरात तीन पक्ष आमने सामने आहेत. असे असले तरी बीडमध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भुमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे. मात्र आतापर्यंत त्यांनी आपली भुमिका जाहीर केली नव्हती, ते कोणाला साथ देणार हे स्पष्ट होत नव्हते. सध्याच्या निवडणूकीच्या अनुषंगाने माजी आ. अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांची बीडच्या निवडणूकीत एण्ट्री झालेली आहे. तापलेल्या याच राजकिय वातावरणात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आता मोठा मास्टरस्ट्रोक मारला आहे. बीडमध्ये ते आता भाजपच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे यांना साथ देणार आहेत. त्यासंदर्भात आज ते आपली अधिकृत भुमिका जाहीर करणार आहेत. तत्पूर्वी काल त्यांनी गेवराईत भाजपचे नेते बाळराजे पवार यांची भेट घेवून पंडितांचे टेन्सन वाढविले आहे. जयदत्त क्षीरसागरांच्या याच भुमिकेसह भेटीगाठीचा बीड आणि गेवराईच्या राजकारणात मोठा प्रभाव पडणार आहे. कारण ▶▶ पान २ वर

# बाळासाहेब गुंजाळ यांना मत म्हणजे विकासाला मत म्हणत आ. विजयराजेंनी थोपटली गुंजाळ यांची पाठ

बीड (दिव्य न्युज):- गेल्या पंचवीस वर्षांपासून माझे आणि बाळासाहेबांचे संबंध आहेत. तो राजकारणातही नव्हता तेंव्हापासूनचे संबंध आहेत. तो काम करणारा तरुण आहे आणि कामे करून दाखविली आहेत. त्यामुळे बाळासाहेब गुंजाळ यांना मत म्हणजे विकासाला मत आहे असे म्हणत आ. विजयसिंह पंडित यांनी बाळासाहेब गुंजाळ यांची पाठ थोपटली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे आणि प्रभाग क्र. २१ च्या उमेदवार सौ. पायल दत्ता जाधव आणि गुंजाळ धर्मराज (बाळासाहेब) लक्ष्मण यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांची प्रचंड जाहिर सभा झाली. नाळवंडी नाका परिसरात झालेल्या सभेला महिला-पुरुष मतदारांसह कार्यकर्त्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

बीड नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र.२१ च्या उमेदवार सौ. पायल दत्ता जाधव आणि गुंजाळ धर्मराज (बाळासाहेब) लक्ष्मण तसेच प्रभाग क्र. १० मध्ये सौ. तांदळे उषा गणेश व



सौ. शेळके रजनी अक्षय यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांच्या जाहिर सभा झाला. यावेळी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय नेत्या डॉ.ज्योती मेटे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिल जगताप, सावता परिषदेचे कल्याण आखाडे, सुहास पाटील, माजी नगरसेवक शेख निजाम, बप्पासाहेब घुगे, ड.राजेंद्र राऊत, पांडुरंग आवारे, सरपंच संघटनेचे कालिदास नवले, अनिल घुमरे, बळीराम गवते यांच्यासह राष्ट्रवादी, शिवसेना, शिवसंग्राम चे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, नगर परिषदेच्या निवडणुकीच्या तोंडावर कार्यकर्ते आणि नागरीकांना वाऱ्यावर सोडून संधी साधूंना बीडची जनता या निवडणुकीत त्यांची जागा दाखवील. शहराचे मुलभूत प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू असे सांगून बीड शहरात विरोधक भ्रम निर्माण करून वेगवेगळ्या अफवा पसरविल्या जात आहेत. कुणाच्याही दबावाला बळी न पडता मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे, बीड शहराच्या उज्वल भविष्यासाठी घडी या चिन्हावर मतदान करून राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करून क्षीरसागरांच्या तावडीतून नगर पालिकेची मुक्तता करा असेही ते यावेळी म्हणाले.

---

पान ४ वरून

## ना.अजितदादांचा

आज होणाऱ्या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

बीड नगरपालिका निवडणुक राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे यांच्यासह शहरातील २६ प्रभागांमधील ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजितदादा पवार आज सोमवार दि. २४ नोव्हेंबर रोजी बीड दौऱ्यावर येत आहेत. अजित दादांच्या उपस्थितीत आज सायंकाळी ६ वाजता मॉं.वैष्णव पॅलेस येथे व्यापारी मेळावा आणि सायंकाळी ७ वाजता सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या व्यापारी मेळावा आणि जाहीर सभेच्या माध्यमातून जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अजितदादा बीड शहराच्या विकास आराखडा संकल्प जनतेसमोर मांडणार आहेत. बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि बारामती सारखा विकास करण्याच्या दृष्टीने अजितदादांची ही सभा महत्त्वाची ठरणार आहे. दादांच्या उपस्थितीत होणारा मेळावा आणि जाहीर सभा बीड मधील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलाताई पारवे आणि ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या विजयाची नांदी ठरणार आहे. या सभेला बीड शहरातील सर्व व्यापारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी केले आहे.

### प्रभाग क्र.१९

प्रमाणात जनसंपर्क असल्याने प्रत्येक मतदारांकडून शेख सोफियान यांना पाठींबा मिळत आहे प्रभागात आयोजीत केले पदयात्रेकडून मिळत असलेला प्रतिसाद या प्रभागातून कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार असेलेले शेख फिरदोस सोफियान यांची विजय निश्चित मानली जात आहे. शेख फिरदोस सोफियान यांच्या प्रचारात खा.रंजनीताई पाटील, मा.मंत्री अशोक पटील, कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष मुहम्मद इलियास टेलर, तालुकाध्यक्ष गणेश बजगुळे पाटील यांची जाहीर सभा आणि प्रचार फेरी होणार आहे याचाही फायदा शेख फिरदोस सोफियान यांना मिळणार आहे.

### माजलगावची फाईट

खलील पटेल यांची माजलगावात फारशी क्रेझ नाही. त्यांच्या विजयासाठी आमदार सोळंके गल्लोगल्ली कॉर्नर सभा घेत असले तरी त्यांच्याच नियोजनात माजलगाव शहराची पूर्ण वाट लागल्याचे माजलगावचे नागरिक बोलून दाखवत आहेत. आ. सोळंके यांची ही सहावी टर्म आहे. मात्र मागच्या पाच टर्ममध्ये त्यांनी माजलगावच्या विकासात काय योगदान दिले? असा प्रश्न मतदारांमधूनच विचारला जातोय.

### नेकनूर पंचायत

आणि वाढत्या जनसंपर्क मोहिमेमुळे अनेक इच्छुक उमेदवारांमध्ये घबराट पसरली असून स्थानिक राजकारणात चांगलीच खळबळ उडाली आहे. नेकनूर परिसरातील तरुणाई, शेतकरी व सर्वसामान्यांशी त्यांचा असलेला संपर्क आणि विकासाभिमुख दृष्टिकोन लक्षात घेता, आगामी निवडणुकीत. यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

पान १ वरून

## आंबेडकरी

करणाऱ्यांची मस्ती जिरवा असे आवाहन अजिंक्य चांदणे यांनी केले. बीड येथील नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद प्रथमच एससी महिलेसाठी राखीव राहिले असल्याने आंबेडकर अनुयायांच्या अपेक्षा वाढल्या होत्या पण राजकीय पक्षांनी आंबेडकरी चळवळीत न्यायासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून केवळ आरक्षणाचे फळ चाखणाऱ्यांना आयात करुन उमेदवाऱ्या वाटून अन्याय केला. अशा परिस्थितीत समाजाने या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवला आणि आज समाजाने निर्णय बैठक आयोजित केली होती. या बैठकीत बोलताना पप्पू कागदे म्हणाले की, पुरोगामी या शब्दावर आपण अनेकांना मोठं केलं पण त्यांनी धोकाच दिला. माझे तिकिट कापले याचा राग नाही पण तुमच्या जातीयवादी विचाराला विरोध आहे. आपण आजपर्यंत अनेक लढाया लढलोत पण ही स्वाभिमानाची लढाई आहे अन् ती जिंकायची आहे. आपला मुस्लिम समाजाला विरोध नाही पण ज्यांनी आमचा हक्क मारला त्यांना सोडणार नाही. येणाऱ्या काळात आपल्याला धडा शिकवायचा असून, २ तारखेला घड्याळ फोडायचे म्हणजे फोडायचे आहे. सर्वांना सोबत घेऊन ही लढाई जिंकायची असून, जातीयवाद्यांना जागा दाखवायची आहे. यामुळे कोणतीही अपेक्षा न ठेवता फक्त निळा झेंडा, स्वाभिमान आणि आंबेडकरी चळवळ डोळ्यासमोर ठेवून आपल्याला तुतारीला विजय करायचा आहे. नगराध्यक्षपदी स्मिता विष्णू वाघमारे यांना बसवायचे आहे. तसेच सर्व उमेदवार हे तुतारीचेच विजयी करायचे आहेत. त्यासाठी एकही मतदार आपला मतदानापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेऊन प्रत्येक उमेदवाराला घरातून बाहेर काढून मतदान करुन घ्याचे आहे असे पप्पू कागदे यांनी आवाहन केले. तसेच अजिंक्य चांदणे हे बोलताना म्हणाले की, आपण अन्याय अत्याचाराच्या विरोधात अनेक लढाया लढलो आहोत. तर आंबेडकरी चळवळ नेहमीच मुस्लिमांच्या पाठीशी राहिली आहे. पण एका मुस्लिमाने आमचा हक्क मारला आहे. पण खरा मुस्लमान कधीच कोणाचा हक्क मारीत नाही. आमचा मुस्लिम समाजाला कसलाही विरोध नाही पण ज्यांनी आमचा हक्क मारला त्यावर नाराजी असून, त्यास जागा दाखवणार आहे. केज, लातूर, सोलापूर आदी ठिकाणी आंबेडकरी समाजावर अन्याय करण्यात येत असून तेथे शांत राहिलो म्हणून हे लोन बीड पर्यंत आले आहे. यामुळे या विरोधात उभे राहून जशास तसे उत्तर देण्याची वेळ आली आहे. या विरोधात कायदा करुन घेण्यासाठी व्यापक लढा सुरू करावा लागणार असल्याचे सांगत स्मिता विष्णू वाघमारे आणि तुतारीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी आंबेडकर अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चौकट

डॉ.ज्योती घुंबरे यांना भीम वस्तीत पाहिले का?

भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे यांना एससी म्हणून निवडणुकीत उतरविण्यात आले आहे. पण त्यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदान काय? चळवळीचे सोडा या ज्योती घुंबरे यांना कोणी भीमनगर मध्ये कधी पाहिले का? प्रश्न उपस्थित करीत. कोणी बुद्धीभेद करेल यावर ही लक्ष राहु द्या. आपल्याला फक्त तुतारीला मतदान करुन आंबेडकरी चळवळीतील स्मिता विष्णू वाघमारे यांना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प.) उमेदवारांना विजयी करायचे असल्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

### जयदत्त आण्णांचा

पालकमंत्री म्हणून त्यांनीही जिल्ह्यात मोठी विकास कामे केलेली आहेत. त्यामुळेच त्यांचाही बीडच्या राजकारणात असलेला मोठा दबदबा कोणालाही नाकारता येणार नाही.

काल जयदत्त क्षीरसागर आणि बाळराजे पवार यांची गेवराईत भेट झाली. यावेळी त्या दोघांमध्ये निवडणूकीसह इतर मुद्यांवर चर्चाही झाली आहे. दरम्यान पवारांच्या याच भेटीमुळे आता अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे टेन्सन खऱ्या अर्थाने वाढले आहे.

येत्या दोन डिसेंबर रोजी नगर पालिकांसाठी मतदान होणार आहे. याअनुषंगानेच सध्या सर्वच राजकिय पक्षांच्या नेत्यांची धावपळ सुरू आहे. तसेच ठिकठिकाणी सभांचा धडाकाही सुरू आहे. कोणत्याही परिस्थितीत नगर पालिकांवर सत्ता आणायचीच असा संकल्प प्रत्येक पक्षांनी केलेला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे बीड शहरात तीन पक्ष आमने सामने आहेत. असे असले तरी बीडमध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भुमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे. मात्र आतापर्यंत त्यांनी आपली भुमिका जाहीर केली नव्हती, ते कोणाला साथ देणार हे स्पष्ट होत नव्हते. सध्याच्या निवडणूकीच्या अनुषंगाने माजी आ. अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांची बीडच्या निवडणूकीत एण्ट्री झालेली आहे. तापलेल्या याच राजकिय वातावरणात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आता मोठा मास्टरस्ट्रोक मारला आहे. बीडमध्ये ते आता भाजपच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे यांना साथ देणार आहेत. त्यासंदर्भात आज ते आपली अधिकृत भुमिका जाहीर करणार आहेत. तत्पुर्वी काल त्यांनी गेवराईत भाजपचे नेते बाळराजे पवार यांची भेट घेवून पंडितांचे टेन्सन वाढविले आहे. जयदत्त क्षीरसागरांच्या याच भुमिकेसह भेटीगाठीचा बीड आणि गेवराईच्या राजकारणात मोठा प्रभाव पडणार आहे. कारण पालकमंत्री म्हणून त्यांनीही जिल्ह्यात मोठी विकास कामे केलेली आहेत. त्यामुळेच त्यांचाही बीडच्या राजकारणात असलेला मोठा दबदबा कोणालाहीनाकारता येणार नाही.

### स्मिता विष्णू वाघमारे

आंबेडकरी समाज बांधवांच्या बैठकीत पप्पूजी कागदे, अजिंक्य चांदणे, बबन वडमारे,राहुल मस्के, वसंतराव ओगले, दिनकर बोराडे,अरुण सवाई, ज्ञानोबा माने, दीपक चौगुले, नितीन सोनवणे, उत्तमराव पवार, सत्यनारायण ढाका, अनुरथ वीर, मायाताई मिसळे, आम्रपाली साबळे, भगवान कांडेकर, सिद्धार्थ शिंगणारे, नितीन वाघमारे, यांच्यासह आंबेडकरी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी स्मिता विष्णू वाघमारे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

ीड नगर परिषदेची नगराध्यक्ष पदाची निवडणूक समाज बांधवांच्या स्वाभिमानाची निवडणूक असून मागासवर्गीय उमेदवारासाठी आरक्षित असलेल्या नगर अध्यक्षपदासाठी अनुसूचित जातीच्या समाजाच्या जागेवर आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी देऊन भू-माफिया, रेती माफिया व गुटखा माफिया यांच्या ताब्यात बीड नगर परिषद देण्यासाठी व आपल्या संविधानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या आरक्षणाच्या हक्क व अधिकारापासून वंचित ठेवण्याचे काम करणाऱ्या अजित पवार यांच्यासह अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी घेतलेल्या निर्णयाला नेस्तनाबूत करण्यासाठी समाजाची एकजूट महत्वाची आहे. बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत आंबेडकरी समाज बांधवांनी राजकीय ताकद निर्माण करण्यासाठी अजित पवार गटाच्या घड्याळ या चिन्हाच्या उमेदवाराला पराभूत करून, स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार आंबेडकरी चळवळीतील सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांनी बैठकीत निर्णय घेवून केला.

या निर्णायक बैठकीस राजू जोगदंड, आशिष चव्हाण, भास्कर सरपते, यशवंत कदम,किसन तांगडे, सुभाष लोणके, अशोक ठोकळ, रवी वाघमारे, हनुमंतराय कांबळे,डी.जी वानखेडे, गौतम सोनवणे, प्रा. बाळासाहेब वाघमारे, प्रा. विठ्ठल गाडे, प्रा. सिरसाट, आदमाने, रमेश माटे, शाहू डोळस, नाना मस्के, महेश आठवले, अनिल बोराडे, संगीता वाघमारे, अरुणाताई आठवले, रेश्माताई जोगदंड,अनिताताई डोंगरे, शोभा गलांडे, शेख भाभी, सुभाष तांगडे, ड.सुरेश वडमारे,ड. तेजस वडमारे,ड. देवत्त शिंदे, ड. राहुल साळवे,ड. अशोक वाघमारे,ड.दीपक ससाणे, सुर्यकांत जोगदंड, मधुकर लोंढे, अशोक वीर, प्रकाश वक्ते, बंडू विसर्जन अविनाश जोगदंड प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, नागेश दुबळे, विलास जोगदंड, संजय हनवते, भारत कांबळे, भैय्या साळवे, गौतम धन्वे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, अक्षय कांबळे, महेंद्र वडमारे, अक्षय कोकाटे, भैय्या मस्के, रतन वाघमारे,नामदेव वाघमारे, सतीश शिनगारे, शाम वीर, गौतम कांबळे, सोनू वडमारे, यांच्यासह बीड शहरातील आंबेडकरी संघटनांचे सर्व पक्षी पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधव या निर्णायक बैठकीस हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

चौकट

काळ्या फिती तोंडाला बांधून अजित पवारांचा निषेध

बीड नगर परिषद निवडणूकीत अजित पवार गटाने आंबेडकरी समाजाला, ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने, आंबेडकरी समाज बांधवांकडून तोंडाला, काळ्या फीती बांधून जाहीर निषेध केला.

### जातीपातीच्या समिकरणावर

शहरातील शाहूनगर आणि गांधीनगर भागात कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागरांसह माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील बैठकीस या भागातील हजारो मतदार उपस्थित होते. त्यामुळे या दोन्ही बैठकांना अक्षरशः सभेचे स्वरूप आले होते.

### माझ्या सहकाऱ्याची

देखील वाल्मिक कराड याच्यावरच होती. त्याच वाल्मिक कराड याच्यावर सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनाचे आरोप झाल्यानंतर त्याला जेलमध्ये जावे लागले. या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे मंत्रिपदही गेले. अनेकदा मंत्रिपद गेल्याची खंतही धनंजय मुंडे यांनी बोलून दाखवली. आज तर परळी नगरपालिकेच्या प्रचारावेळी वाल्मिक कराडची आठवण काढून अण्णा समर्थकांना त्यांनी चुचकारण्याचा प्रयत्न केला.

मला माझ्या सहकाऱ्याची आज आठवण येतेय. परळीतले जगमित्र कार्यालय १२ महिने २४ तास सुरू होते आणि आहे. पण तिथे एक व्यक्ती नाहीये. त्या कार्यालयातून अडल्या नडलेल्यांना गोरगरिबांना आपण मदत करायचो. पण या सगळ्यात एक सहकारी आपल्यात नाहीये, याची मला जाणीव आहे. कुणाचे काय चुकले, काय नाही हे न्यायदेवता तपासून पाहील, असे धनंजय मुंडे म्हणाले. परळीच्या प्रचारसभेत वाल्मिक कराड याची आठवण काढून शहरात हजारोंच्या संख्येने असलेल्या वाल्मिक अण्णा समर्थकांना चुचकारण्याचा प्रयत्न धनंजय मुंडे यांनी केल्याची चर्चा आहे.

वाल्मिक कराड याच्यावर आरोप झाल्यानंतर धनंजय मुंडे यांनी सहकाऱ्यासाठी खुलेपणाने बाजू मांडली नाही, असे प्रत्यपक्षणे सांगत कराड कुटुंबियांनी नाराजी व्यक्त केली. तसेच राजकीय क्षेत्रात दमदार कामगिरी करीत असताना राजकीय कटाच्या उद्देशातून त्यांना अडकविण्यात आल्याचा गंभीर आरोप कराड कुटुंबियांनी केला. यामुळेच धनंजय मुंडे यांनी वाल्मिकची आठवण करून नगर परिषद निवडणुकीवेळी भावनिक खेळी खेळल्याचे देखील बोलले जाते.दुसरीकडे धनंजय मुंडे यांच्या बदनामीबद्दल पंकजा मुंडे यांनी खंत व्यक्त केली. एखाद्या कारणामुळे एखाद्यावर आरोप होतात. परंतु आरोप झाल्यानंतर अनेकदा संबंध नसलेले लोक देखील भरडले जातात. गव्हाबरोबर किडेही रगडले जातात, असे म्हणत एकप्रकारे धनंजय मुंडे यांनी कड घेण्याचा पंकजा मुंडे यांनी प्रयत्न केला.